# बेडेकर व्यवस्थापन महाविद्यालयात राष्ट्रीय वित्त संमेलन

## भारतीय अर्थव्यवस्था सध्या आमूलाग्र परिवर्तन अनुभवत आहे.

Loksatta ठाणे | October 22, 2015 3:23 AM



**'वित्त बाजारावर अर्थव्यवस्थेचा प्रभाव' या विषयावर आधारित राष्ट्रीय वित्त संमेलन २०१५ चे आयोजन करण्यात आले होते.**

**वित्त बाजारावर अर्थव्यवस्थेचा प्रभाव**

जागतिक बाजारपेठेत स्पर्धक म्हणून भूमिका बजावत असल्यामुळेच भारतीय अर्थव्यवस्था सध्या आमूलाग्र परिवर्तन अनुभवत आहे. भारतीय अर्थव्यवस्था निश्चित दिशेने आणि ठरावीक दराने होणारी वार्षिक आर्थिक वाढ, थेट विदेशी गुतंवणुकीत होणारी वाढ, भांडवली बाजारातील फुगवटा, अशा मार्गाने प्रवास करत असतानाच वित्तीय बाजारामध्ये गुतंवणूकदार सध्या अत्यंत जटिल समस्यांना तोंड देत आहेत. त्यामधील काही महत्त्वाची उदाहरणे म्हणजे रिझर्व बँकेने केलेली व्याज दरातील कपात, तेलाच्या किमतीमधील अस्थिरता आणि उत्पादक / उत्पादनामधील प्रचंड स्पर्धा. हे सर्व लक्षात घेऊन भारतीय वित्तीय क्षेत्रांतील या अस्थिर परिस्थितीच्या पाश्र्वभूमीवर डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन महाविद्यालयातर्फे 'वित्त बाजारावर अर्थव्यवस्थेचा प्रभाव' या विषयावर आधारित राष्ट्रीय वित्त संमेलन २०१५ चे आयोजन करण्यात आले होते.

शैक्षणिक संस्था आणि औद्योगिक संस्था यांच्यामध्ये परस्पर संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न या संमेलनाच्या माध्यमातून करण्यात आला. आपले ज्ञान आणि कौशल्य वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले पाहिजेत, असे मत महाविद्यालयाचे संचालक डॉ. नितीन जोशी यांनी या वेळी बोलताना मांडले. त्याचबरोबर महाविद्यालयाचे सरसंचालक डॉ. गुरुप्रसाद मूर्ती यांनी भारतीय अर्थव्यवस्थेची वर्तमान स्थिती आणि जागतिक बाजारपेठ या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच अॅग्रिकल्चर सर्व्हिस ऑफ साउथ एशियाचे शामल गुप्ता यांनी वित्त बाजारातील मूलभूत संकल्पनांचे महत्त्व स्पष्ट करून वित्तीय क्षेत्रातील विविध संकल्पानांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. कर्मयोग नॉलेज अॅकॅडमीचे संचालक अमित त्रिवेदी यांनी म्युच्युअल फंड, तेलाच्या किमती आणि चलन दर यामधील अस्थिरता, जोखीम व्यवस्थापन आदी मुद्दय़ांवर भाष्य केले. श्रीकांत शेट्टी यांनी अर्थव्यवस्थेतेतील बदलांचा वित्त बाजारावर होणारा परिणाम या विषयावर आपली मते मांडली. वित्त बाजारातील सेबीचे कार्य आणि भूमिका, सेबी आणि एफएमसी विलीनीकरण या विषयावर जितेंद्र कुमार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. गौरव कपूर यांनी वित्त बाजारातील नॅशनल स्टॉक एक्स्चेंजचे महत्त्व तसेच भारतीय बाजारातील व्यवहार या संदर्भात विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. संमेलनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. स्मिता जपे यांनी आभारप्रदर्शन केले.

First Published on October 22, 2015 3:23 am